# "मराठी तितुका मेळवावा"
# (विश्वसंमेलन)

मराठी भाषेचा सर्वांगीण प्रचार व प्रसार सर्वत्र व वैश्विक स्तरावर होण्यासाठी तसेच, सर्वांमध्ये मराठीतून संवाद करण्याची रुची निर्माण करण्यासाठी, दैनंदिन वापरामध्ये मराठी भाषेचा अधिकाधिक वापर करण्यासाठी जनतेला प्रोत्साहित करण्याकरिता "मराठी तितुका मेळवावा" या उदात्त हेतूने एक विश्व संमेलन मुंबईत आयोजित करण्याचे मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन यांनी योजिले आहे.

मराठी भाषा, साहित्य, संस्कृती आणि कला यांना एक दीर्घ परंपरा व स्वतंत्र ओळख आहे. महाराष्ट्राच्या या दीर्घ परंपरेचा उत्सव साजरा व्हावा, मराठी संस्कृतीला उजाळा मिळावा, अभिजात मराठी साहित्याचे श्रवण व्हावे, पारंपरीक कला अभिव्यक्त व्हाव्यात, उद्योग कल्पनांचे आदान-प्रदान व्हावे यासाठी भारतातील आणि भारताबाहेरील मराठी भाषिकांचे एक भव्य स्नेहसंमेलन संपन्न व्हावे, असा महाराष्ट्र शासनाचा मानस आहे. त्यासाठी मुंबई येथे दिनांक ४, ५ व ६ जानेवारी, २०२३ या कालावधीत "मराठी तितुका मेळवावा" हे मराठी भाषिकांचे आंतरराष्ट्रीय स्नेहसंमेलन आयोजित करण्यात येणार आहे.

सदर विश्व संमेलनात परदेशस्थ मराठी उद्योजकांना प्रोत्साहित करणे तसेच त्यांच्यापैकी ज्या उद्योजकांना महाराष्ट्रामध्ये उद्योग सुरू करावयाचा असेल किंवा भांडवली गुंतवणूक करायची असेल तर त्या उद्योजकांना योग्य ती शासकीय मदत उपलब्ध करून देणे हाही एक महत्त्वाचा उपक्रम या विश्वसंमेलनात आयोजित करण्यात आलेला आहे.

लुप्त होत चाललेली वाद्य संस्कृती, खाद्य संस्कृती, वस्त्र संस्कृती यांचे स्पर्धात्मक सादरीकरण तसेच मराठी साहित्य, कला, संगीत या सर्व सांस्कृतिक अंगांचा परामर्ष घेणे हा सुध्दा या संमेलनाच्या आयोजनाचा हेतू आहे. यामध्ये मराठी पारंपरीक खेळ (लेझीम, ढोल, ताशे), मराठी पारंपरीक मनोरंजन (नाटक, लावणी, लोकसंगीत), समग्र मराठी साहित्याचे प्रतिनिधित्व करणारे भव्य ग्रंथ प्रदर्शन, मराठी भाषिक खेळ व स्पर्धा अशा अनेकानेक कार्यक्रमांची मेजवानी यावेळी उपस्थितांना मिळणार आहे.

वरील संमेलनात आपला सहभाग प्रार्थनीय आहे. तरी, या संमेलनासाठी उपस्थित राहू इच्छिणाऱ्या आपल्या मराठी मंडळाच्या सदस्यांची संख्या व तपशील दिनांक १५ नोव्हेंबर, २०२२ पर्यंत sec.marathibhasha@maharashtra.gov.in या ई-मेलवर कळवावा, ही विनंती.

दिपक केसरकर
मंत्री, मराठी भाषा

मनीषा पाटणकर- म्हैसकर
प्रधान सचिव, मराठी भाषा विभाग